# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०८/२०२४ (शनिवार)**

---

## पोलीस स्टेशन रामटेक जि. नागपूर ग्रामिण कडुन घरफोडीचे गुन्हे उघडकिस आणुन मुद्देमाल हस्तगत

पोलीस स्टेशन रामटेक अप. क्र. ५३८/२०२४ कलम ३३१(४), ३०५(A) भा.न्या.स. मध्ये घरफोडी करून चोरी झालेली काळया रंगाची मोपेड ॲक्टीव्हा क्र. एम.एच.–४०/सि. एफ.–३५९० किंमती ५०,०००/–रू. ची अज्ञात चोरांनी चोरून नेली होती. सदर गुन्ह्यात गोपनिय बातमीदारांकडुन माहीती प्राप्त करून तिन विधीसंघर्षीत बालकांना नागपूर शहर हद्दीतुन ताब्यात घेवुन त्यांचेकडुन गुन्ह्यात चोरी केलेली काळया रंगाची मोपेड ॲक्टीव्हा क्र. एम.एच. ४०/सि. एफ.–३५९० किंमती ५०,०००/– रू. ही जप्त करण्यात आली.

पोलीस स्टेशन रामटेक अप. क्र. ३२०/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि मध्ये गोपनिय बातमीदाराकडुन माहीती प्राप्त करून आरोपी नामे १) हर्ष उर्फ छोटु योगेश डेहरिया वय १९ वर्ष रा. इंदिरा माता नगर, आनंद बहारी यांचे घरी किरायाने, यशोधरानगर, नागपूर २) निलेश उर्फ निक्कु उर्फ बारीक गुलाबराव धार्मिक वय २१ वर्ष रा. वनदेवी नगर, पिलीनदी, डॉ. आंबेडकर वार्ड, नागपूर यांना अटक करून त्यांचेकडुन गुन्ह्यात चोरी केलेली नगदी ८१९०/– रू. व गुन्ह्यात वापरलेली काळया रंगाची होंडा कंपनीची ॲक्टीव्हा मोपेड क्र. MH 49 CB 4770 किंमती ४०,०००/–रू. असा एकुण ४८,१९०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस स्टेशन रामटेक अप. क्र. २८७/२०२४ कलम ४५७, ३८० भादंवि मध्ये अप. क्र. ३२०/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि मधील अटक आरोपी १) हर्ष उर्फ छोटु योगेश डेहरिया वय १९ वर्ष रा. इंदिरा माता नगर, आनंद बहारी यांचे घरी किरायाने, यशोधरानगर, नागपूर २) निलेश उर्फ निक्कु उर्फ बारीक गुलाबराव धार्मिक वय २१ वर्ष रा. वनदेवी नगर, पिलीनदी, डॉ. आंबेडकर वार्ड, नागपूर यांना विचारपुस करून त्यांचेकडुन नगदी २१००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कारवाई मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण, मा. श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण, मा. श्री. रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांचे मार्गदर्शनात पोनि प्रशांत काळे, पोउपनि श्रीकांत लांजेवार, पोउपनि हरिश्चंद्र मोरे, पोहवा अमोल इंगोले, पोहवा नारायण भोयर, पोना प्रफुल रंबई, पोना मंगेश सोनटक्के, पोशि शरद गिते, पोशि धिरज खंते यांनी केली.




## पोस्टे भिवापूर अंतर्गत आगामी सण उत्सवबाबत तसेच
## गावातील कायदा व सुवेवस्थेबाबत पोलीस पाटलांची आढावा बैठक संपन्न

पोलीस स्टेशन भिवापूर येथे आज दिनांक ०३/०८/२०२४ रोजी ११/०० वा. ते १३/०० वाजता दरम्यान पोलीस पाटील यांची माहेवारी बैठक घेण्यात आली. सदर बैठक दरम्यान आगामी सण उत्सव बाबत तसेच गावातील कायदा व सुव्यवस्थेबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले. सदर बैठक दरम्यान खालील प्रमाणे सूचना देण्यात आल्या. गावात येवून जे लोक घरगुती सामान विकतात त्यांचेवर लक्ष ठेवणे तसेच अनोळखी इसमावरही लक्ष ठेवणे. सदर बैठकीला पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल तसेच गावातील पोलीस पाटील उपस्थित होते.




**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**